**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**सार्वजनिक आरोग्य खाते**

ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय वडाळा मुंबई ४०० ०३१.

क्र. एचओ/ **642** /एएलएच दि **25.07.24**

**जाहिरात**

**विषय :-** सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आंतररुग्णकक्ष, शौचालये तसेच व त्यांच्या बाह्यपरिसराच्या साफसफाईच्या कामासाठी एका वेळी सहा महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर ९ बहुउद्देशिय कामगार पुरविण्याकरीता सेवाभावी संस्थेची नेमणूक करण्याबाबत.

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आंतररुग्णकक्ष, शौचालये तसेच व त्यांच्या बाह्यपरिसराच्या साफसफाईच्या कामासाठी एका वेळी सहा महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर ९ बहुउद्देशिय कामगार पुरविण्याकरीता इच्छूक स्वयंसेवी संस्थेकडून मोहरबंद इच्छापत्र मागवित आहोत.

| | | |
|---|---|---|
| १ | बहुउद्देशिय कामगारांची संख्या | ९ |
| २. | कामाचे स्वरूप व तपशील | **कामाचे स्वरुप:-**<br>स्वयंसेवी संस्था यांनी कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाच्या दिनांकापासून आंतररुग्णकक्ष, शौचालये तसेच व त्यांच्या बाह्यपरिसराच्या साफसफाईची कामे पार पाडण्याकरिता दररोज एका पाळीत स.७.३० वा. ते दु. ३.३० वा. पर्यंत या वेळेत ९ बहुउद्देशीय कामगार नियुक्त करणे आवश्यक आहे.<br>**कामाचा तपशील:-**<br>१. आंतररुग्ण कक्षांची शौचालये यांची दर दिवशी दोन वेळा तसेच त्यांच्या बाह्यपरिसराची व रुग्णालयातील परिसराची दर दिवशी एकवेळा साफसफाई करणे .<br>२. आंतररुग्ण कक्षातील दैनंदिन साफसफाई- पंखे, टेबल, खुर्च्या, दरवाजे व खिडक्या यांची तसेच रुग्णांचे बिछाने, लॉकर्स यांची साफसफाई करणे.<br>३. वरिष्ठांनी सांगितलेली इतर कामे करणे.<br>**कामाच्या अटी/शर्ती**<br>1. निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थेस प्रतिदिन प्रती बहुउद्देशीय कामगारांचे वेतन रु.७६४.०३ यादराने + लेव्ही ४९.५८% (वेतनाबाबत प्रमुख कामगार अधिकारी यांच्यामार्फत वेळोवेळी प्रसारित होणा-या परिपत्रकानुसार अदा करण्यात येईल.) चे अधिदान करण्यात येईल.प्रचलित नियमानुसार आयकर व इतर खर्च/ दंड मासिक वजावट करण्यात येईल.<br>2. निवड झालेल्या संस्थेने बायोमेट्रीक उपस्थिती नोंदविणे याकरीता बहुउद्देशिय कामगारांच्या नोंदणीकरीता कामगारांची यादी (संस्थेच्या लेटरहेडवर) व सोबत त्यांचे ओळखपत्र (आधारकार्ड/पॅनकार्ड/ड्रायविंग परवाना यापैकी एक ) कंत्राट सुरु होण्याच्या २ दिवस अगोदर सादर करणे आवश्यक राहील.<br>3. संस्थेस रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बहुउद्देशिय कामगार |

| | | |
|---|---|---|
| ५ | | पुरविणे बंधनकारक असेल.<br>4. संस्थेमार्फत पुरविण्यात येणा-या बहुउद्देशिय कामगारांना आठवड्यातून एकदा साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकाराक असेल.<br>5. बहुउद्देशिय कामगारांना बायोमेट्रीक उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल.<br>6. सदर संस्थेने त्यांच्याकडील कार्यरत बहुउद्देशिय कामगारांना मासिक अनुदानाचे अधिदान त्यांच्या बँक खात्यामध्ये **ECS/NEFT/RTGS** प्रणालीतून करणे बंधनकारक आहे.<br>7. सदर संस्था बहुउद्देशीय कामगारांना प्रतिदिन देण्यात येणारी रक्कम किमान वेतन कायद्यानुसार आहे याबाबत दक्षता घेईल.<br>8. प्रस्तावित कामाच्या ठिकाणी बाल कामगार कार्यरत असणार नाही याबाबत संबंधित संस्था योग्य ती दक्षता घेईल.<br>9. संस्थेने पुरविण्यात येणा-या बहुउद्देशिय कामगारांना ओळखपत्र व गणवेश देणे बंधनकारक राहील.<br>10. बहुउद्देशिय कामगाराने कामाच्या ठिकाणी कर्तव्य कालावधीमध्ये ओळखपत्र लावणे आवश्यक राहील. |
| ३ | संस्थेकडून बहुउद्देशिय कामगारांसाठी पुरविण्यात येणारे आवश्यक साहीत्य. | **सुरक्षितता साधणे**:- गणवेश, हातमोजे, फेसमास्क, गमबुट, रेनसूट, साबण, तसेच भौगोलिक परिस्थितीनुसार आवश्यक असलेले इतर साहित्य पुरविणे आवश्यक राहील. |
| ४ | या कामासाठी कोणती संस्था अर्ज करू शकते. | १) महानगरपालिकेकडे नोंद असलेली सेवाभावी संस्था.<br>२) सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद सादर करणे बंधनकारक राहील.<br>३) संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवानाधारक.<br>४) कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२/१९५२ अतंर्गत नोंदणी परवानाधारक.<br>५) कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवानाधारक.<br>६) महाराष्ट्र शासन व केंद्र शासनांचे सर्व कामगार कायदे पाळणे बंधनकारक आहे.<br>७) महानगरपालिका रूग्णालयामध्ये किमान सहा महिन्यांचा रुग्णालयीन कामाचा अनुभव (काम समाधानकारक असल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र ) असणे बंधनकारक आहे.<br>८) GST नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे.<br>९) संस्थेच्या नावाने पॅन कार्ड असणे बंधनकारक आहे.<br>१०) ज्या संस्थां काळया यादीत आहे किंवा ज्या संस्थेचे काम बृहन्मुंबई महागरपालिकेला समाधानकारक वाटले नाही म्हणून काढून टाकले आहे. तसेच कामपूर्ण करु शकले नाही त्या संस्थानी या कामासाठी अर्ज करू नये. कारण अशा संस्थाना आपोआप अपात्र ठरविण्यात येईल . |
| ५ | अर्ज (इच्छापत्र) स्विकारण्याचा दिनांक | दि. २९/ ०७ /२०२४ पासून दि. ०२/०८ /२०२४ सकाळी ११ वा.ते ४ वा. पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ६ | अर्ज (इच्छापत्र) स्विकारण्याचे वेळ व ठिकाण. | वेळ:- सकाळी ११ वा. ते दूपारी ४.०० वाजेपर्यंत (शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून) विहित तारखेनंतर व वेळेनंतर आलेले अर्ज (इच्छापत्र) विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कुठलाही पत्रव्यव्हार स्विकारला जाणार नाही.<br>(अर्ज (इच्छापत्र) मोहरबंद लिफाफामध्ये असणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज (इच्छापत्र) स्विकारले जाणार नाहीत.)<br><br>**पत्ता:-** वैद्यकिय अधिक्षक, ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय, मेजर परमेश्वरन मार्ग, वडाळा (प.) मुंबई ४०० ०३१. |
| ७ | **अर्ज छाननी शुल्क**:- | रु. ३३०० + १८ % जीएसटी = रु.३८९४/-<br>(सदर रक्कमेचे चलन रुग्णालयाच्या कार्यालयामधून कार्यालयीन वेळेत चलन प्राप्त करुन बृहन्मुंबई महागरपालिकेच्या जवळच्या नागरी सुविधा केंद्रात भरणा करुन भरणा पावती अर्जासोबत सादर करावी. |
| | **अर्ज (इच्छापत्र) सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे** | १. सेवाभावी संस्था महानगरपालिकेकडे नोंद असलेले कागदपत्रे.<br>२. संस्थेची घटना व उपविधी.<br>३. सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद.<br>४. संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना.<br>५. कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ / १९५२ अतंर्गत नोंदणी परवाना.<br>६. कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना.<br>७.महानगरपालिका रूग्णालयामध्ये किमान सहा महिन्यांचा रुग्णालयीन साफसफाईच्या कामाच्या अनुभवाची (अनुभव प्रमाणपत्र ) कागदपत्रे.<br>८. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव, पद मोबाईल नंबर यांची सुची.<br>९. संस्थेचे पॅन कार्ड.<br>१०. GST नोंदणी क्रमांक .<br>११. वास्तव्याचा पुरावा लेटरहेडवर.<br>१२. संस्थेने रू.२०० च्या स्टॅप पेपरवर हमी पत्र सोबत दिलेल्या परिशिष्ट-ड नमुन्यात सादर करावा.<br>१३. कागद पत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिकाऱ्यांचे ज्यात अध्यक्ष , सचिव व अन्य एक पदाधिकारी यांचे स्वत:च्या स्वाक्षरी सहीत फोटो देणे आवश्यक आहे.<br>वरील सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे. व संस्थेने अध्यक्ष व सचिव अथवा ज्यांना संस्थेशी संबंधित कागदपत्रावर स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत केले असेल त्यांनी अर्जाच्या व हमी पत्राच्या प्रत्येक पानावर संस्थेची मोहर व स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. |
| ८ | निवड प्रक्रिया | पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची छाननी केली जाईल. एक संस्था एकच अर्ज सादर करू शकते. अर्ज करणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी अन्य संस्थेच्या कार्यकारणी पदावर आढळल्यास एकच संस्था पात्र ठरेल. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने संस्थाची नेमणूक करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | अ.क्र.२ कामाचे स्वरूप व तपशील यामध्ये नमूद केलेल्या कामासाठी ९ बहुउद्देशिय कामगार पुरविण्याबाबत सर्व पात्र संस्थांची कार्यालयाच्या सुचना फलकावर सुची जाहिर केली जाईल.<br>जर एखाद्या संस्थेने त्यांना दिलेले काम करण्यास नकार दिल्यास/ असमर्थ ठरली तर उर्वरित पात्र सुचीतील संस्थांमधून सोडत काढण्यात येईल. अर्जदार नेमुन दिलेल्या कामाची आपापसात अदलाबदल करू शकत नाही. |
| ९ | संस्थानी करावयाची कार्यवाही | संस्थेने काम पुर्ण झाल्यानंतर देयक आवश्यक कागदपत्रांसह ०७ दिवसाच्या आत कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | निविदेबाबतचे अधिकार | निवेदेतील कोणतीही अट शिथिल करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अथवा कोणतेही कारण न देता इच्छापत्रासाठी केलेली मागणी रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांना असतील. |
| ११ | कामाचे पुनर्वाटप | संस्थेला मिळालेले काम दुसऱ्या संस्थेला कामाचे पुनर्वाटप करून देता येणार नाही.<br>दिलेले काम त्याच संस्थेने करणे बंधनकारक राहील.<br>जर एखादी संस्था दिलेले काम करण्यास असमर्थ ठरली तर दूसऱ्या संस्थेची नेमणूक पात्र सुचीतील संस्थामधून कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या मंजुरीने करण्यात येईल. |
| १२ | अनामत रक्कम आणि विधी आणि लेखनसाहित्य आकार | निवड करण्यात आलेल्या संस्थेस करार रक्कमेच्या २ टक्के इतकी अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.<br>(महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या कामासाठी अनामत रक्कम भरली असेल तरी ती अनामत रक्कम ह्या कामासाठी ग्राह्य धरली जाणार नाही.)<br>विधी आणि लेखनसाहित्य आकार महानगरपालिकेच्या विधी खात्याकडून प्रसारीत होणा-या परिपत्रकानुसार देय असेल. |
| १४ | दंड | परिशिष्ट 'ब'प्रमाणे |

सही/-
वैद्यकीय अधिक्षक
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

दि....../......../२०२४

प्रति,
मा. वैद्यकिय अधिक्षक,
ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय,
मेजर परमेश्वरन मार्ग,
वडाळा (प.) मुंबई ४०० ०३१.

<u>इच्छापत्र</u>
<u>(अर्जाचा नमूना)</u>

विषयः- सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालयाच्या आंतररुग्णकक्ष, शौचालये तसेच व त्यांच्या बाह्यपरिसराच्या साफसफाईच्या कामासाठी एका वेळी सहा महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावर ९ बहुउद्देशिय कामगार पुरविण्याकरीता सेवाभावी संस्थेची नेमणूक करण्याबाबत.

संदर्भ:- जाहिरात क्र....................... दि....../......./२०२

अर्जाचा तपशील:-

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | मेसर्स........................................................ |
| २ | संस्था महानगरपालिका नोंदणी क्रमांक | ................................................................ |
| ३ | बीएमसी वेंडर क्रमांक | ................................................................ |
| ४ | पत्रव्यवहारासाठी संस्थेचा संपूर्ण पत्ता | कार्यालय:-.................................................<br>...............................................................<br>पिनकोड क्र................................................<br>दुरध्वनी :-................................................<br>भ्रमरध्वनी:-................................................<br>फॅक्स:-.......................................................<br>ईमेल आयडी:-............................................. |
| ५ | संस्थेचा पॅन क्रमांक | ................................................................ |
| ६ | संस्थेचा जीएसटी क्रमांक | ................................................................ |
| ७ | कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना क्रमांक | ................................................................ |
| ८ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२ /१९५२ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | ................................................................ |
| ९ | कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना क्रमांक. | ................................................................ |

| | | |
|---|---|---|
| १० | बीएमसी रुग्णालयामध्ये काम केल्याचा अनुभव | होय /नाही.<br>असल्यास,कार्यालय/रुग्णालयाचे नाव ……………………<br>……………………………………………………………<br>…………………………………………………… |
| ११ | संस्थेस महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकले आहे का ? | होय /नाही. |

मी खालील कागदपत्रांच्या स्थळप्रती साक्षांकीत करुन सोबत जोडत आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | कागदपत्राचा पृ.क्र.नमूद करावा |
|---|---|---|
| १ | संस्था महानगरपालिकेकडे नोंद असलेले कागदपत्रे. | |
| २ | संस्थेची घटना व उपविधी. | |
| ३ | सन २०२३-२०२४ असल्यास किंवा लगतच्या वर्षाचा ताळेबंद. | |
| ४ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | |
| ५ | संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन ) १९७० अन्वये परवाना. | |
| ६ | कामगार भविष्यनिर्वाह निधी अधिनियम १९४२/१९५२ अतंर्गत नोंदणी परवाना. | |
| ७ | कामगार राज्य विमा योजना १९४८ अतंर्गत नोंदणी परवाना. | |
| ८ | महानगरपालिका रूग्णालयामध्ये किमान सहा महिन्यांचा साफसफाईच्या कामाच्या अनुभवाची (अनुभव प्रमाणपत्र ) कागदपत्रे. | |
| ९ | संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे संपूर्ण नाव, पद मोबाईल नंबर यांची सुची. | |
| १० | संस्थेचे पॅन कार्ड. | |
| ११ | GST नोंदणी क्रमांक . | |
| १२ | वास्तव्याचा पुरावा लेटरहेडवर | |
| १३ | रू.२०० च्या स्टॅप पेपरवर हमी पत्र सोबत दिलेल्या परिशिष्ट- क नमुन्यात. | |
| १४ | कागद पत्रांसोबत संस्थेच्या किमान तीन पदाधिकाऱ्यांचे ज्यात अध्यक्ष, सचिव व अन्य एक पदाधिकारी यांचे स्वत:च्या स्वाक्षरी सहीत फोटो देणे आवश्यक आहे. | |
| १५ | छाननी शुल्क भरणा पावती | |

मी असे घोषित करतो/ करते की जाहिरातीतील अटी/शर्ती वाचल्या असून अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे खरी असून, सदर माहिती व कागदपत्रे खोटी आढळून आल्यास माझी संस्था सदर कामासाठी अपात्र ठरेल.

अर्जदार
संस्था अध्यक्ष /सचिव
सही /रबरी शिक्का

**(संस्थेने रु. २०० च्या मुद्रांकीत कागदावर द्यावयाचा हमीपत्राचा नमुना )**

**परिशिष्ट 'क'**

**प्रति,**
**कार्यकारी आरोग्य अधिकारी**
**सार्वजनिक आरोग्य खाते**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**

मी श्री/ श्रीम-........................................................या संस्थेच्या पदाधिकारी म्हणून ....................................या पदावर दिनांक ..................... पासून कार्यरत असून संस्थेच्या नियमानुसार/ ठरावानुसार मला संस्थेच्या वतीने सदर हमीपत्र देण्याचा अधिकार असून त्यानुसार मी खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

१. मुंबई महागरपालिकेच्या 'ॲक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय' येथे रुग्णालयाच्या आंतररुग्णकक्ष, शौचालये तसेच व त्यांच्या बाह्यपरिसराच्या साफसफाईच्या कामाकरिता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशिय कामगारांचा पुरवठा करण्याचे काम आमच्या संस्थेला मिळण्यासाठी मी अर्ज केला असून अर्जात नमूद केलेले सर्व तपशील माझ्या माहीतीनुसार योग्य व खरे आहेत.

२. मी शपथपुर्व जाहीर करतो की, आमच्या संस्थेचा उद्देश हा संस्थेच्या सभासदांना रोजगार मिळवून देणे हा असून आझी संस्थां कार्यादेश मिळाल्सास योजनेच्या नियमानुसार काम करेल याची हमी या द्वारे देते.

३. आम्हाला मिळालेल्या कार्यादेश संपूर्ण अथवा विभागून अन्य संस्था किंवा कंत्राटदारास देणार नाही.

४. सदर कामात राज्य/ केंद्रशासनाने पारीत केलेल्या सर्व सभासद कायद्यांचे आम्ही संपूर्ण पालन करु.

५. अर्जात नमुद केलेल्या सर्वबाबी मी वाचल्या आहेत व त्या मला समजले आहेत. परिशिष्टातील अटी मला मान्य आहे. मी असे जाहीर करतो / करते की अर्जात दिलेली माहीती माझ्या विश्वासानुसार सत्य व योग्य असून ती असत्य दिसून आल्यास मी कारवाईस पात्र असून संस्थेला दिलेले काम / कार्यादेश रद्द होवू शकतो हे मला मान्य आहे.

स्वाक्षरी:-
नाव:-
संस्थेचे नाव व शिक्का